नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०५ Issue - 105 | वार - बुधवार दि. ९ सप्टेंबर २०२६ Blow- Wednesday Date 9 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पावसाचा खंड पडलेल्या विभागांतील पिकांचे सर्वेक्षण करा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली माहिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील काही भागांत पावसाने दीर्घ खंड दिल्याने पिके अडचणीत आली असताना, अशा भागांतील नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील ज्या भागांत पावसाची मोठी तूट आहे, तेथे पिकांची स्थिती तपासून आवश्यक ती मदत करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पिके वाचविण्यासाठी दिवसाला १२ तास वीज देण्याबरोबरच जळालेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तातडीने बदलण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पीकपाहणी आणि राज्यातील पर्जन्यमानाचा आढावा घेण्यात आला. ज्या ठिकाणी पावसाचा मोठा खंड पडला आहे आणि त्यामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, त्या भागांचे सर्वेक्षण सुरू करण्याचे आदेश मुख्य सचिवांना देण्यात आल्याचे बावनकुळे यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. राज्यातील काही भागांत पावसाची तूट लक्षणीय आहे. विदर्भात सुमारे ३५ टक्के पाऊस कमी झाला असून, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण कमी आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक ठिकाणी पिके आणि पाण्याची उपलब्धता अडचणीत आली आहे. त्यामुळे एकीकडे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे, तर दुसरीकडे पिकांना वाचविण्यासाठी आवश्यक ते सिंचन उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पिकांना पाणी देण्यासाठी दिवसाला १२ तास वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर जळालेले रोहित्र तातडीने बदलून वीजपुरवठा सुरळीत करण्यासही सांगण्यात आले आहे. ज्या भागात पिके वाचविणे शक्य होणार नाही, तेथे सर्वेक्षण आणि पंचनाम्यांच्या आधारे नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही केली जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पुढील आठवड्यात पावसाची शक्यता कमी असल्याच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील परभणी, बीड, हिंगोली आदी जिल्ह्यांसाठी स्वतंत्र पॅकेज किंवा विशेष उपाययोजना करण्यात येणार का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सध्या सर्वप्रथम पंचनामे करणे महत्त्वाचे असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. पाऊस परतला आणि पावसाची तूट भरून निघाली तर परिस्थिती सुधारेल; अन्यथा सरकारकडून आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचेही वर्षभराचे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील विविध जलसाठ्यांमध्ये किती पाणी उपलब्ध आहे आणि ते पुढील काळात कशा पद्धतीने वापरता येईल, याचे नियोजन करण्याची सूचना बैठकीत करण्यात आली. सध्या उपलब्ध असलेले पाणी आणि जलसाठे जपून वापरणे आवश्यक असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

गणेशोत्सव आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेबाबतही बैठकीत सूचना देण्यात आल्या. सण-उत्सव शांततेत पार पडण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. दरम्यान, साखर कारखान्यांचा गाळप हंगाम लवकर सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयाला काही कारखानदार आणि शेतकऱ्यांकडून विरोध होत असल्याबाबत विचारले असता, सरकारची भूमिका योग्य असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. गाळप हंगाम लवकर सुरू झाल्यास त्याचा पुढे फायदा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेतील प्रकार गंभीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बीकेसीतील कार्यक्रमस्थळी बनावट ओळखपत्रासह दोन जणांना ताब्यात घेतल्याच्या घटनेवरही बावनकुळे यांनी भाष्य केले. पीएमओ अधिकाऱ्याचा बनावट पास तयार करून कार्यक्रमस्थळी प्रवेश करण्याचा प्रयत्न आणि एका व्यक्तीकडे शस्त्र आढळणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची केंद्र आणि राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, या प्रकारामागे नेमके कोण होते, त्यांचा उद्देश काय होता आणि पंतप्रधानांच्या सुरक्षेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न होता का, याचा तपास होईल, असे बावनकुळे म्हणाले. या प्रकरणातून कोणीही सुटणार नाही आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ग्रामपंचायतींच्या कारभाराला मिळणार गती; मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीला मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुदत संपलेल्या, मात्र प्रशासकीय अडचणींमुळे निवडणुका अद्याप झालेल्या नसलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराला आता गती मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत अधिसूचना जारी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय कारणांमुळे अद्याप निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, अशा ग्रामपंचायतींवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येणार आहे. नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रशासकांचा कार्यकाळ महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यंत किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहणार आहे.



सरपंच परिषदेच्या पाठपुराव्याला यश

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी सरपंच परिषदेचे महाराष्ट्र-मुंबई अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत राहण्यासाठी प्रशासक नियुक्त करण्याची मागणी त्यांनी मंत्री गोरे यांच्याकडे केली होती. या पाठपुराव्यानंतर शासनाने सकारात्मक निर्णय घेत अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे मुदत संपलेल्या आणि निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निर्णयामुळे निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींचा प्रशासकीय कारभार ठप्प होणार नाही. ग्रामस्थांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा, विकासकामे आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे सुरू ठेवण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक सक्षम, प्रभावी आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# ‘नाराज फुफाजींना आता काम मिळालं!’ पीएम मोदी यांची विरोधकांवर तुफान टोलेबाजी

वडोदरा : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील वडोदरा येथे आयोजित 'नमो फॉर विकसित भारत' या कार्यक्रमात ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले. या सोहळ्यात आपल्या सरकारच्या विकासकामांचा लेखाजोखा मांडताना त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. सरकारच्या विकास धोरणांवर शंका उपस्थित करणाऱ्यांना टोला लगावताना त्यांनी 'नाराज फुफाजी' असा उल्लेख केला, ज्यामुळे राजकीय वर्तुळात नवा वाद निर्माण झाला आहे.

२,८०० किमीच्या फ्रेट कॉरिडॉरचे लोकार्पण; कामाच्या पद्धतीची तुलना

या कार्यक्रमात पंतप्रधानांनी २,८०० किलोमीटर लांबीच्या विशेष रेल्वे मालवाहतूक मार्गाचे (डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर) उद्घाटन केले आणि याला '२१ व्या शतकातील ऐतिहासिक टप्पा' म्हटले. या प्रकल्पाच्या निमित्ताने त्यांनी भाजप आणि काँग्रेस सरकारच्या कामातील फरक दाखवून दिला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात या प्रकल्पाची पायाभरणी झाली होती, मात्र २००४ ते २०१४ या यूपीए सरकारच्या १० वर्षांच्या काळात हा प्रकल्प रखडला होता. २०१४ मध्ये भाजप सरकार सत्तेत आल्यावरच या कामाला खरी गती मिळाली, असे पंतप्रधान म्हणाले.

'नाराज फुफाजींना आता काम मिळाले' - पंतप्रधानांचा चिमटा

या प्रकल्पाच्या फायद्यांवर प्रश्न विचारणाऱ्यांवर टीका करताना पंतप्रधान म्हणाले, काही नाराज फुफाजी ओरडत होते की आता ट्रक ड्रायव्हर्सचे काय होणार? पण या फुफाजींना आता काम मिळाले आहे. स्वातंत्र्यानंतरही ज्या भागात रेल्वे लाईन पोहोचली नव्हती, तेथे हा कॉरिडॉर पोहोचत आहे. देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत करून भारताला 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत गरजेचा होता, असेही त्यांनी स्पष्ट केले.

‘चिप्सपासून जहाजांपर्यंत’ - मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात भारताची भरारी

पूर्वीच्या सरकारवर टीका करताना मोदी पुढे म्हणाले, २०१४ नंतर भारताने ५०,००० आधुनिक रेल्वे डबे तयार केले, तर पूर्वीचे सरकार १० वर्षांत ५०,००० शौचालयेसुद्धा बांधू शकले नव्हते. भारत आता मायक्रोचिप्सपासून ते मोठ्या जहाजांपर्यंत सर्व गोष्टींची निर्मिती देशातच करत असून, मॅन्युफॅक्चरिंगच्या क्षेत्रात एका नव्या युगाची सुरुवात झाली आहे.

**गोगाव येथील शिंदे गटाचे भाजपमध्ये मोठ्या संख्येने पक्षप्रवेश**

**आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा**

# वागदरी जिल्हा परिषद गटात शिवसेना शिंदे गटाला खिंडार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : वागदरी जिल्हा परिषद गटातील गोगाव येथे भारतीय जनता पक्षात मोठ्या संख्येने ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत आणि अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बसवेश्वर ग्रुपसह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

वागदरी जिल्हा परिषद गटात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषद सदस्य निवडून येऊन अद्याप आठ महिनेही पूर्ण झालेले नसताना विकासकामे आणि दिलेली आश्वासने पूर्ण होत नसल्याची नाराजी कार्यकर्त्यांमध्ये असल्याचा दावा भाजप कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. यापूर्वीही मौजे सदलापूर येथील शिवसेना शिंदे गटातील मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर आता गोगावमध्ये झालेल्या या सामूहिक पक्षप्रवेशामुळे वागदरी गटातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### आनंद तानवडे यांचे मन परिवर्तनाचे प्रयत्न; कार्यकर्ते नेतृत्वावर ठाम

**दरम्यान, आनंद तानवडे यांनी रविवारी गोगाव येथे भेट देऊन काही कार्यकर्त्यांशी चर्चा करत त्यांचे मन परिवर्तन करण्याचे प्रयत्न केले. मात्र, आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी व उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखालीच काम करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.**



या प्रवेश सोहळ्यास आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, पंचायत समिती उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य विकास बुळा, पंचायत समिती सदस्य अप्पासाहेब किवडे, मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, युवा नेता बसवराज शेळके,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, युवा नेते शिवराज (मंत्री) पोमाजी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**सागरदादांचा ‘करिष्मा’ गोगावमध्ये दिसला; भाजपमध्ये जोरदार इनकमिंग**

गोगाव येथील पक्षप्रवेशाकडे आगामी स्थानिक राजकीय घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना म्हणून पाहिले जात आहे. युवकांसह ग्रामस्थांचा भाजपकडे वाढता कल आणि सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वावर व्यक्त होत असलेला विश्वास यामुळे या प्रवेशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सागरदादा कल्याणशेट्टी यांची सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कार्यपद्धती, कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क आणि स्थानिक प्रश्नांबाबतची भूमिका यामुळे वागदरी गटातील युवक व ग्रामस्थ भाजपशी जोडले जात असल्याचे भाजप कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. पक्षसंघटनेबरोबरच माणसे जोडण्यावर भर देत असल्याचा संदेश या पक्षप्रवेशातून देण्यात आला.

**शिवसेना शिंदे गटातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश**

या पक्षप्रवेश सोहळ्यात शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष विनोद आलुरे यांच्यासह अशोक मुलगे, महादेव बिराजदार, महेश कलशेट्टी, दत्तात्रेय पाटील, बसवराज पाटील, कलप्पा वाडे, माजी सरपंच अनिल मुलगे, मल्लिनाथ बिराजदार, बसवराज वाडे, सुरेकांत पाटील, धनराज बिराजदार, निंगण्णा तावरखेड, सुदर्शन निळ, सूर्यकांत जिरगे, मल्लिनाथ जिरगे, नागराज पाटील तसेच संपूर्ण बसवेश्वर ग्रुप व ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

### माणसं जोडणे हाच आमचा अजेंडा!

**भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक स्वागत. आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली वागदरी गटाच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करू. युवकांचा भाजपकडे वाढता ओढा ही आमच्या संघटनेची ताकद आहे. माणसं जोडत विकासाची वाटचाल अधिक गतिमान करणार.**

**– सागरदादा कल्याणशेट्टी**
**उपसभापती, अक्कलकोट पंचायत समिती**

या सामूहिक पक्षप्रवेशामुळे गोगावसह संपूर्ण वागदरी जिल्हा परिषद गटात भाजपची संघटनात्मक ताकद वाढल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला. आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न सुरू असून, सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून युवक व कार्यकर्त्यांना संघटनेशी जोडण्याचे काम सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

नव्याने भाजपमध्ये प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले. आगामी काळात गोगाव तसेच वागदरी गटाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

तालुक्याच्या विकासासाठी भाजपच्या माध्यमातून तसेच आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे सुरू असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. गावामध्ये विविध विकासकामे होत असून, या विकासाच्या वाटचालीमुळे आपण सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यावर ठाम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय....

### निर्णयांचा धडाका

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत क्रीडा, आरोग्य, वस्त्रोद्योग आणि विधी व न्याय विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्याचा मोठा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. याशिवाय सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने नवा प्रकल्प राबवण्यास आणि सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन सत्र न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील यशस्वी आणि गुणवंत खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या नवीन सुधारित धोरणामुळे पूर्वीचे सर्व शासन निर्णय, शासन शुद्धिपत्रके, परिपत्रके आणि संबंधित पत्रे पूर्णपणे रद्द करण्यात आली आहेत. सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक सुदृढ, अद्ययावत आणि तंत्रज्ञानस्नेही करण्यासाठी प्रगती प्रकल्प राबवला जाणार आहे. हा प्रकल्प सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबवला जाईल. यासाठी आशियाई विकास बँकेकडून कर्ज घेण्यास आणि त्यात राज्य शासनाचा हिस्सा समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात आली. माढा येथे नवीन न्यायालयः सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येणार आहे. या न्यायालयासाठी आवश्यक असणारी पदे निर्माण करण्यास आणि खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. भांडवली अनुदानः वस्त्रोद्योग विभागांतर्गत 'ह्योसंग इंडिया प्रा. लि.' यांना भांडवली अनुदान देण्यास मंजुरी देण्यात आली. मुंबईतील 'कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटर'च्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दराने नूतनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. चेंबूर येथील 'भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन' या संस्थेला त्यांच्या सध्याच्या वहिवाटीत असलेली जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विकसित करण्यात येत असलेली शासकीय जमीन 'श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला' हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली.

## टाकळीवाडी येथे श्री यल्लमा देवीची यात्रा उत्साहात संपन्न

**हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ; दर्शनासाठी भाविकांच्या रांगा**

**टाकळीवाडी/प्रतिनिधी**

टाकळीवाडी येथील जागृत देवस्थान श्री यल्लमा देवीची श्रावण महिन्यातील यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. श्रावण महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंचक्रोशीतील तसेच परिसरातील हजारो भाविक भक्तांनी देवीचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला.




यात्रेनिमित्त सकाळी श्री यल्लमा देवीची विधिवत अभिषेक व पूजा करण्यात आली. त्यानंतर देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. भक्तिमय वातावरणात भाविकांनी देवीचे दर्शन घेतले.

श्रावण महिन्यातील शेवटच्या मंगळवारचे विशेष महत्त्व असल्याने पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने टाकळीवाडी येथे दाखल झाले होते. दिवसभर मंदिर परिसरात 'यल्लमा देवीच्या नावाने चांगभलं'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.

महाप्रसादासाठी भाविकांची मोठी उपस्थिती होती. आयोजक व मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. यात्रा उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडल्याने भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

# श्रीधर फडके: ज्योतीने तेजाची आरती



आपल्याकडे अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्व आहेत आणि होऊन गेलीत. आज दि.९ सप्टेंबर, संगीतकार श्रीधर फडके यांचा जन्मदिन- वाढदिवस. श्रीधर फडके हे भारतातील श्रेष्ठ गायक आणि संगीतकार म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म मुंबईत १९५० मध्ये झाला. महान कलाकार सुधीर फडके यांचा मुलगा श्रीधर फडके होय. मुंबईत जन्मलेले श्रीधर फडके हे मराठी संगीत उद्योगात चार दशकांहून अधिक काळ एक प्रेरणाशक्ती म्हणून कार्यरत आहेत. मराठी चित्रपट आणि संगीतातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे आणि त्यांची प्रतिष्ठित गाणी सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या जवळची बनली आहेत.

श्रीधर फडके (सप्टेंबर ९, १९५० – हयात) महाराष्ट्रातील, भारतातील श्रेष्ठ संगीतकार व गायक आहेत. त्यांचा जन्म मुंबई येथे दि.९ सप्टेंबर १९५० रोजी झाला. ते विख्यात गायक व संगीतकार सुधीर फडके यांचे पुत्र आहेत. संगीतकार, गायक आणि निर्माता म्हणून फडके यांनी मराठी संगीत जगतात आपली प्रभावी छाप सोडली आहे. मी शिवाजीराजे भोसले बोलतोय आणि राजा शिवछत्रपती ही त्यांची गाणी मराठी अभिमान आणि संस्कृतीचे गीत बनली आहेत. त्याच्या संगीताने अनेक पिढ्या ओलांडल्या गेल्या आहेत. वडिलांच्या शास्त्रीय संगीतावरील प्रभाव असल्यामुळे श्रीधर फडके यांचा संगीतातील प्रवास तरुण वयात सुरू झाला. एकल संगीतकार म्हणून ठसा उमटवण्यापूर्वी त्यांनी कीबोर्ड प्लेअर आणि सहाय्यक संगीतकार म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. सन १९८३ मध्ये चिमणी पाखरं या चित्रपटाने त्यांची प्रगती झाली आणि तेव्हापासून त्यांनी १०० हून अधिक मराठी चित्रपट आणि असंख्य अल्बमना संगीत दिले आहे. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत, फडके यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार आणि व्ही. शांताराम पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळून सन्मान मिळाला आहे. त्यांना खरे फळं हे चाहत्यांकडून मिळालेल्या प्रेमात, प्रतिसादात आणि कौतुकामध्ये आहे. जे त्याच्या संगीताची खरंच कदर करतात.

गीत रामायण आणि सुधीर फडके: श्री प्रभू रामचंद्रांचे चरित्र म्हणजे हिंदू संस्कृतीचा गौरवशाली इतिहास. सर्वश्रेष्ठ आदिकवी महर्षी वाल्मिकींनी चोवीस हजार श्लोकांचे रामायण लिहिले. भारतीयांच्या मनावर या रामायणाने हजारो वर्षे राज्य केलं आहे. संस्कृत मध्ये ९४ रामायणे आहेत. मराठी, हिंदी, तामिळ, कानडी, तेलुगु, गुजराती, डोगरी, बंगाली, ओडिसी, असामी, फारसी, प्राकृत, अशा प्रादेशिक भाषेतून सुद्धा रामायण सर्व भाषिकांपर्यंत पोहचले आहे. कवी मोरोपंतानी तर १०८ रामायणे रचली. संत एकनाथ, श्री समर्थरामदास, अशा संत आणि अनेक साहित्यिकांनी रामायणाच्या माध्यमातून जनतेच्या मनाची जडण घडण केली आहे. जगाच्या इतर भाषांत सुद्धा इंग्लिश, जर्मन, इटालियन भाषेत रामायण आहे. इतके सगळे रामायणाचे अवतार. पण, गदिमांची रससिद्ध प्रज्ञा आणि बाबूजींची सांगीतिक प्रतिभा यांचा अजोड अविष्कार म्हणजे मराठी गीतरामायण. महर्षी वाल्मिकींच्या रामायण या महाकाव्याला सरस्वतीपुत्र ग.दि.माडगुळकर यांनी केवळ छपन्न गीतात समर्पूर्त साकार केलं. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेला हा एक मराठी विश्वातला चमत्कारच होता. पिढ्यान पिढ्या स्मरणात राहील अशी कलाकृती म्हणजे हे ''गीत रामायण या गीत रामायणाने मराठीला अजरामर केलंय, याचा आम्हा मराठी माणसांना अभिमान आहे.

या गीत रामायणाने रसिक श्रोत्यांवर, अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही वेड लावले. का नाही लावणार? एकतर ही रामायणातील गीते आपल्या बोली भाषेतली, नवरसांनी ओतप्रेत भरलेली, मधुर चालींची, कमालीची भावोत्कट. भारतीय जीवन मूल्यांची महती सांगणारी, मनुष्य जीवनातले आदर्श कसे असावेत याचा धडा देणारी, चांगले व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी प्रेरणा देणारी गीते. शिवाय बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांच्या स्वर्गीय संगीत, सुरेल चाली आणि दैवी आवाजामुळे ही रामायणातली गाणी साक्षात रामकथेतील प्रसंग, पात्रे आणि घटनाक्रम यांचे मूर्तिमंत चित्र डोळ्यासमोर उभे करतात. कवीच्या शब्दातील भावना जशाच्या तशा रसिकांपर्यंत पोहोचवण्याच काम त्यांनी केलं आहे. सिद्धहस्त गदिमांच्या कवितेतील शब्दांचा भाव, कवीची भूमिका अत्यंत तन्मयतेने गाण्यातून सादर केली आहे. तरीही गदिमा आणि बाबूजी दोघेही याचे श्रेय घेत नाहीत. ते श्रद्धेने म्हणतात की,गीतरामायण आम्ही केलेले नाही ते आमच्या हातून झाले आहे. नाहीतर संगीत क्षेत्रात आज असंख्य मोठमोठे कार्यक्रम होत आहेत. पण जोपर्यंत त्याची माध्यमातून प्रसिद्धी होत आहे तोपर्यंतच ते लक्षात राहतात. गीत रामायणाचे हेच वैशिष्ठ आहे, म्हणूनंच ते निर्मिती नंतर ६० वर्षांनी सुद्धा कोटी कोटी लोकांच्या मनात घर करून आहे, गदिमा याबद्दल त्यांच्या कवितेत म्हणतात–

अजाणतेपणी केव्हा, माता घाली बाळगुटी !
बीज धर्माच्या द्रुमाचे, कणकण गेले पोटी !!
छंद जाणतेपणीचा, तीर्थे काव्याची धुंडिली!
कोणा एका भाग्यवेळी, पूजा रामाची मांडिली !!

गदिमांनी एका शुभ क्षणी रामाची पूजा मांडली आणि प्रासादिक रचना असलेल्या गीत रामायणाचा जन्म झाला. पण रामकथेचे बीज त्यांच्या मनावर लहानपणीच रुजले होते. तर बाबूजी थोर गायक व संगीतकार याबरोबरच कट्टर हिंदुत्ववादी आणि निष्ठावान देशभक्त होते. निश्चयी स्वभावचे, कडक शिस्तीचे, कष्टाळू, कलेची गुणग्राहकता असलेले, व्यावसाईक निष्ठा असणारे आणि स्वताच्या व्यक्तिमत्वात राम असलेले होते. गीत रामायण म्हटले की गदिमा आणि बाबूजी दोघेही आलेच. गदिमाबद्दल लिहायचे तर बाबूजी अनिवार्य आणि बाबुजीबद्दल लिहायचे तर गदिमा अनिवार्य आहेत. इतके ते कवी, संगीतकार आणि गायक म्हणून एकरूप झालेले. बाबूजींचा कोल्हापूरमधील बालमित्र माधव पातकर यांनी एच.एम.व्ही. कंपनीसाठी गीते लिहिणाऱ्या ग.दि.माडगुळकर यांची

### ९ सप्टेंबर: श्रीधर सुधीर फडके वाढदिवस

साधारण सन १९३८।३९ च्या सुमारास कोल्हापूरला,''हा माझा मित्र राम फडके, गातो आणि गाण्यांना चाली लावतो'' अशी बाबुजीशी ओळख करून दिली ती मैत्री शेवटपर्यंत होती. गदिमांच्या ''दर्यावरी नाच करी, होडी चाले कशी भिरीभिरी'' या गीताला बाबुजींनी चाल लाऊन दिली, सर्वांना ती खूप आवडली. या गाण्याचे रेकॉर्डिंग व्हायच्या आधी कोल्हापूरला साहित्य संमेलन भरले होते, अध्यक्ष होते प्र.के.अत्रे. संमेलनातल्या कार्यक्रमात हे गाणं बाबुजींनी म्हणावं असा सगळ्यांनी आग्रह केला आणि काय आश्चर्य, ''वन्स मोअर'' मिळाला. रसिकांनी प्रचंड दाद दिली होती. तेव्हापासून गदिमा आणि सुधीर फडके ही दोन नावं कवी आणि गायक, संगीतकार म्हणून साऱ्या कोल्हापूरला माहिती झाली, पण लोकांच्या मनात आणि घराच्या देव्हाऱ्यात जाऊन बसली ते गीत रामायणामुळे.

सन १९५४ साली गदिमांनी गीतरामायण लिहीले ते पुणे आकाशवाणी केंद्रासाठी. गीतरामायण प्रकल्पाचे प्रमुख होते सीताकांत लाड. सीताकांत लाड गदिमा आणि बाबूजींचे जिवलग मित्र. गदिमा पुण्यात तर बाबुजी मुंबईत. एव्हाना दोघेही त्यांच्या चित्रपट व संगीत क्षेत्रात अत्यंत व्यस्त होते, तरीही हे काम त्यांनी अत्यंत श्रद्धेने, आनंदाने आणि श्रीरामाच्या प्रेमापोटी भारावून जाऊन केले. अडचणी तर सुरुवातीपासून होत्याच. गीत रामायणातल्या पहिल्याच गीताचा प्रसंग, ललितताई फडके आणि आनंद माडगुळकर यांनी त्यांच्या आठवणीत सांगितला आहे. गदिमांनी रामायणाचे पाहिलेच गीत लिहिले आणि ते त्यांचे मित्र नेमीनाथ यांच्या बरोबर बाबुजींकडे पाठवून दिले. आकाशवाणीत ऐन ध्वनिमुद्रणाच्या वेळी बाबूजींना ते मिळेना, धावपळ आणि शोधाशोध झाली, इकडे गदिमा गीत पाठवून दिल्यावर आपले काम झाले म्हणून निवांत झोपले होते. सीताकांत लाड यांनी गदिमांना निरोप पाठून बोलावून घेतले. ते आल्यानंतर गीत हरवल्याचे कळताच भडकले. वातावरण निवल्यानंतर सिताकांतानी गदिमांना सांगितले उद्या प्रसारण आहे, तेव्हा गीत तर तुम्हाला लिहावेच लागेल आणि त्यांनी गदिमांना गीत लिहिण्यासाठी एका खोलीत बसवून बाहेरून कडी घातली. तर १० ते १५ मिनिटातच गदिमांनी दार वाजविले. पहातात तर काय, नवं गीत लिहून सिताकांतांच्या हातात ठेवलं. हे नवं गीत पहिल्या हरवलेल्या गीतासारखच होतं. फक्त ''ज्योतीने तेजाची आरती !'' या शब्दांची भर त्यात पडली होती. हे होतं गीतरामायणातलं पहिलं गीत- ''स्वये श्री राम प्रभू ऐकती, कुश लव रामायण गाती !

अशा प्रकारे गीतरामायणाचे दर आठवड्याला एक अशी ५६ गाणी पुणे आकाशवाणी केंद्रावरून वर्षभर प्रसारित झाली. अगदी ताजी ताजी ! रेकोर्डिंग रात्री ११ ते पहाटे ५ पर्यंत चालायचे. बाबूजी त्यासाठी दर आठवड्याला पुण्याला येत. गम्मत म्हणजे मुंबईच्या लोकांना गीतरामायण काय प्रकार आहे याची जराही कल्पना नव्हती. कारण पुणे आकाशवाणीचे कार्यक्रम मुंबईला ऐकू येत नसत.त्याची क्षमता कमी होती. ट्रांझिस्टर तर नव्हताच, रेडीओ ठराविक लोकांकडेच. त्यामुळे एकत्र रस्त्यावर जमून गीत रामायण ऐकले जायचे. ते सुरु होण्यापूर्वी लोक रेडिओला हार घालायचे, उदबत्ती ओवाळायचे, नमस्कार करायचे आणि भक्ती भावाने गीत रामायण ऐकायचे. ते संपल्यावर प्रसादही वाटायचे. इतकी प्रभू रामचंद्रांवर श्रद्धा. त्यानंतर मुंबई, नागपूर, इंदोर, भोपाळ, हैद्राबाद, दिल्ली आकाशवाणी केंद्रावरून अनेक वेळा गीतरामायणाचं प्रसारण झालं. अजूनही होतंय. चैत्रात गुढीपाडवा ते रामनवमी या काळात तर गीतरामायण हमखास लागलेच पाहिजे. एव्हढंच काय गीतरामायणाच्या सर्व प्रथम प्रकाशित झालेल्या कॅसेट्स विकत घेवून घराघरातून त्याचा आस्वाद घेतला जाई. आज रामनवमी असली तर, सकाळपासूनच ही गीते रेडीओ, दूरदर्शनच्या विविध चॅनेल वरून प्रक्षेपित होतात.

सुधीर फडके यांच्या सुस्वर कंठातून बाहेर पडलेले रामायण संपूर्ण महाराष्ट्राने सर्वेन्द्रियांचे कान करून ऐकले, अजूनही ऐकताहेत. यातील गीतांचे करूण रस, रौद्र रस, वीर रस, भयानक, अद्भुत अशा सगळ्या भावनांचे झपाटल्यासारखे सादरीकरण होत असे. आजही ही गाणी ऐकताना श्रोतागणही झपाटून जातो. बाबूजी या गीतातून आपल्यासमोर शोकविव्हल दशरथ, शंकाकुल सीता, चिडलेला लक्ष्मण, संतापी भरत, प्रत्यक्ष उभे करतात. या गीत रामायणाचे बाबुजींनी १८०० प्रयोग केले. याची आठ भारतीय भाषांत भाषांतरे झाली. पण विशेष म्हणजे हे भाषांतर जसेच्या तसे झाले आहे आणि ही गीतं बाबूजींच्या मूळ चालीवरच गायली जातात. बालगंधर्व आणि हिराबाई बडोदेकर हे बाबूजींचे गायनातले आदर्श होते. त्यांनी भावगीतं, भक्तीगीतं, लोकगीतं, लावणी, भारुड, चित्रपटसंगीत असे विविध प्रकार हाताळले. त्यांनी हिराबाई बडोदेकर, बालगंधर्व, पं.भीमसेन जोशी, लता मंगेशकर, आशा भोसले, माणिक वर्मा, मोहम्मद रफी, मन्ना डे अशा दिग्गज गायकांच्या स्वरांना साज चढविला आहे. हा माझा मार्ग एकला, लाखाची गोष्ट, प्रपंच, जगाच्या पाठीवर, मुंबईचा जावई, चंद्र होता साक्षीला, झाला महार पंढरीनाथ, वंदे मातरम असे मिळून ११० चित्रपटाना त्यांनी संगीत दिलंय. त्याला लोकांनी प्रचंड दाद दिली आहे. ज्योती कलश छलके'' आणि खुश है जमाना आज पहली तारीख है, या संगीत दिलेल्या आणि दिसलीस तू फुलले ऋतू, तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे, अशी अनेक भावगीतं बाबूजींच्या सुमधुर आवाजामुळे अजरामर झाली आहेत. पण एकूण त्यांच्या कारकीर्दीचा मुकुटमणी म्हणजे आनंद सोहळा असलेले गीतरामायणच.

पुण्याच्या नगर वाचन मंदिरात एकदा मृत्युंजयदिना निमित्त स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ह्द्य सत्कार समारंभात बाबुजींनी ''सागरा प्राण तळमळला हे गीत म्हटलं. कार्यक्रमानंतर सावरकर बाबूजींना म्हणाले, तू माझं हे गाणं दोन वेळा म्हटलंस, पण मला तुझं गीत रामायण ऐकायचं. मग लगेच रात्रीच्या सत्कार कार्यक्रमात बाबूजी गायले. दैवजात दुःखे भरता, दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती, पुत्र मानवाचा हे बाबुजींच्या आवाजातलं यमन कल्याण रागातलं गीत ऐकून सावरकरांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यानंतर ते गहिवरून बाबूजींना म्हणाले, कुणाचं अधिक कौतुक करू? तुझं कि माडगूळकराचं?

वैयक्तिक आयुष्यात बाबूजींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांची मूल्ये जपली. स्वातंत्र्यवीर सावरकर बाबूजींचे प्रेरणास्थान होते. वीर सावरकर हा सावरकरांच्या जीवनावरील चित्रपट बाबुजींनी अत्यंत निष्ठेने आणि कष्टाने बनवला. या चित्रपटाचा प्रवासही अत्यंत खडतर होता. सोपी गोष्ट नव्हती .पण बाबुजींनी ''हा चित्रपट पूर्ण करेन मगच मरेन'', ही त्यांची प्रतिज्ञा पूर्ण करून दाखवली. कलेबरोबरच त्यांच्यातील देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी त्यांच्या आयुष्यातल्या अनेक घटनांवरून दिसते. ते गोवा मुक्ती आंदोलनातले सशस्त्र क्रांतिकारक होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रचारक म्हणून जबाबदारीही त्यांनी पार पाडली होती. अमेरिकेत इंडिया हेरीटेज फौंडेशन स्थापन झाले ते बाबूजींच्या प्रेरणेमुळेच.

संगीत क्षेत्रात कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांची झालेली मानहानी, सोसलेले अपार कष्ट, हाल, वाईट अनुभव घेवून सुद्धा नंतरच्या काळात मिळालेली अफाट लोकप्रियता, श्रोत्यांच्या ह्रदयात मिळवलेलं अढळ स्थान यामुळे त्यांचं जीवन कृतार्थ झालं असं वाटतं. असे हे जगाच्या पाठीवरचे रामभक्त आहेत. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!! वाढदिवसानिमित्त श्रीधर सुधीर फडके यांना सप्ताहभर निरामय जीवनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**– संकलन व सुलेखन –**

**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजी.**

राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

**शिक्षक दिनानिमित्त विविध उपक्रम; शिक्षकांचा झाला सन्मान**

**सौ. संगीता देशमुख यांचे प्रतिपादन**

# निरोगी आणि आनंददायी जीवन जगण्यासाठी आपले आरोग्य चांगले राहणे महत्त्वाचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : मानवी जीवनामध्ये आनंददायी निरोगी जीवन जगण्यासाठी आपले आरोग्य चांगले राहणे अत्यंत महत्त्वाचे असून आनंददायी आणि निरोगी जीवन जगण्यासाठी वेलनेस आणि फिटनेस सेंटरमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन धाराशिव जिल्ह्याच्या आरोग्य गुरु सौ. संगीता सुरेश देशमुख यांनी जळकोट तालुका तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.



दिनांक दि.५ सप्टेंबर २२६ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय सचिव / संपर्क प्रमुख अरुण लोखंडे यांच्या पुढाकारातून जळकोट तालुका तुळजापूर येथे जिवक वेलनेस अँड फिटनेस सेंटर जळकोट व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ संघ मुंबई चे विभागीय संपर्क कार्यालयाचे उदघाटन आणि शिक्षकांचा सत्कार अशा आनंददायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी वेलनेस अँड फिटनेसच्या धाराशिव जिल्ह्याच्या आरोग्य गुरु

सौ.संगीता देशमुख बोलत होत्या पुढे बोलताना त्या म्हणाल्या की सध्या मानवी आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत असून संकरित आहारामुळे माणसाला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे विशेषत स्त्रियांमध्ये आजारांचे प्रमाण अधिक दिसून येत आहे.वजन वाढणे,वजन कमी होणे,अशक्तपणा जाणवणे, रक्तदाब,मधुमेह, हाता पायाला मुंग्या येणे वगैरे आजाराला आपणाला सामोरे जावे लागत आहे.या पासून सुटकारा मिळण्यासाठी आहातून आरोग्य कडे हे ब्रिद घेवून निरोगी शरीर, निरोगी मन,निरोगी जीवन हाच आमचा संकल्प हा मूलमंत्र जपत वेलनेस आणि फिटनेस ची संकल्पना पुढे आलेली असून आपल्या निरोगी आणि आनंददायी आरोग्यासाठी जिवक वेलनेस आणि फिटनेस सेंटर मध्ये आपण सहभागी व्हावे असे आवाहन शेवटी त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश दादा सोनटक्के हे होते तर उद्घाटक म्हणून आरोग्य गुरु सुरेश देशमुख हे होते.या वेळी वेलनेस आणि फिटनेस सेंटर से वरिष्ठ सल्लागार महेश लोमटे,महेश कांबळे, बाळासाहेब केसकर,विनोद जाधव,संतोष मुसळे,हनुमंत कांबळे,काकासाहेब देशमुख, राम प्रजापती आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले,स्त्री शिक्षणाच्या प्रनेत्या क्रंती ज्योती सावित्रीमाई फुले आणि देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आधी महामानवांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून उद्घाटक सुरेश देशमुख यांच्या हस्ते फित कापून जीवक वेलनेस अँड फिटनेस सेंटर जळकोट व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

. या प्रसंगी शिक्षक दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने शिक्षकांचा येथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिल छत्रे,प.स. सदस्य अँड. आशिष सोनटक्के, कृषी उत्पन्न बाजार समिती मुरूम चे संचालक भालचंद्र लोखंडे, प्रा.शरद गायकवाड, आनंद पिंटू पुदाले,सुरज डावरे, राजेश लोखंडे,स्वदेश लोखंडे,युवराज लोखंडे,प्रदीप लोखंडे,उमेश गायकवाड सतीश गायकवाड पत्रकार विजय पिसे,संजय रेणुके,शामकांत नागीले,दादासाहेब बनसोडे,किशोर धुमाळ, सतीश पिसे,इरफान काझी सचिन कदम,आकाश अलकुंटे,मंगेश सुरवसे महिला कार्यकर्त्या ज्योतीताई लोखंडे, अंजली छत्रे,सोनल भालेराव, जया माने,मनीषा गायकवाड, सपना गायकवाड,नगीना लोखंडे,सहशिक्षिका आवटे मॅडम,रेणुके मॅडम,महामुनी मॅडम,सोमवंशी मॅडम,

भोसले मॅडम,मोकाशे मॅडम,सहशिक्षक विजय मोरे, भैरवनाथ कानडे,पंडित कदम,अभिमन्यू कदम, शिवाजी सुरवसे,भालचंद्र पोतदार, आणाप्पा सरकाळे सर, कदम सर,माने सर,साखरे सर, गौतम राठोड सर,बालाजी माळी सर सह शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश औसेकर सर यांनी केले तर सूत्रसंचालन एस. के. गायकवाड यांनी केले व आभार प्रदर्शन चंद्रकांत स्वामी सर यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आ.अभिजीत पाटील यांनी प्रशासनासमोर मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

## ८ तास वीज, पीक नुकसानभरपाई, चारा छावण्यांसह विविध मागण्यांचे प्रशासनाला निवेदन; पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले व जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी :

माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी आज सोलापूर येथे पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले आणि सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांची भेट घेतली. यावेळी मतदारसंघातील विविध ज्वलंत प्रश्नांचे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी आ. अभिजीत पाटील यांनी केली.

सध्या माढा आणि पंढरपूर तालुक्यात सुरू असलेल्या सिंगल फेज लोडशेडिंगमुळे शेतकरी आणि नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. शेतीची कामे, पाणीपुरवठा तसेच दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत असल्याने लोडशेडिंग कमी करून शेतकऱ्यांना किमान आठ तास वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी आ. पाटील यांनी केली.

माढा, माळशिरस आणि पंढरपूर तालुक्यांसह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेक भागांत दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी आ. पाटील यांनी केली.

**माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक सध्या अनेक अडचणींचा सामना करत आहेत. पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान झाले आहे, तर दुसरीकडे वीजपुरवठ्याच्या प्रश्नामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. प्रशासनाने कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून तातडीने पंचनामे, नुकसानभरपाई, चारा छावण्या आणि पाणीपुरवठ्याच्या उपाययोजना कराव्यात. शेतकरी आणि नागरिकांना दिलासा मिळेपर्यंत त्यांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा सुरूच ठेवणार आहे.**

**– आ. अभिजीत पाटील (माढा विधानसभा मतदारसंघ)**

तसेच जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता कमी होत असल्याने गरजू गावांमध्ये तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत प्रशासनाने तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबांवर शिक्षणाचा वाढता खर्च मोठा आर्थिक भार ठरत आहे. त्यामुळे शाळांमधील विद्यार्थ्यांची फी कमी करण्याबाबत योग्य निर्णय घेऊन पालकांना दिलासा द्यावा, अशी मागणीही आ. पाटील यांनी प्रशासनासमोर मांडली.

शेतकऱ्यांकडे वीज कनेक्शन अस्तित्वात असतानाही त्यांच्या गरजेनुसार सोलर कनेक्शनची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. वीजपुरवठ्याच्या समस्येवर दीर्घकालीन उपाय म्हणून सौरऊर्जेच्या सुविधेला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे आ. पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

**रोजगार हमीची कामे सुरू करा**

पावसाअभावी शेतीची कामे ठप्प झाल्याने ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजुरांसमोर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू करून शेतकरी व मजुरांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही आ. पाटील यांनी केली. प्रशासनाने मतदारसंघातील वीज, पाणी,



चारा, पीक नुकसान, रोजगार आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी आ. अभिजीत पाटील यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

# दुष्काळाच्या छायेत शेतकऱ्यांच्या बांधावर महसूल अधिकारी; शेतकऱ्यांना दिला धीर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब (प्रतिनिधी) : वाशी तालुक्यातील मौजे सारोळा मांडवा, सेलू, डोंगरेवाडी सज्जा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने पिके वाळून जाण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी डी.व्ही. सिरसेवाड पाटील यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पीक पाहणी केली व शेतकरी बांधवांना धीर दिला.





पावसाअभावी शेतकरी पूर्णपणे खचून गेला असून, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून पिके कशी वाचवता येतील याकडे लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच पिकांबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होणार असल्याने पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

दरम्यान, ई-पीक पाहणीबाबत शेतकऱ्यांनी काळजी करू नये, असे सांगत त्यांनी नियोजनाची माहिती दिली. DCS मोबाईल ॲपद्वारे ई-पीक पाहणी वेळेत पूर्ण करण्यासाठी सज्जातील प्रत्येक गावात दोन सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली असून त्यांना गावनिहाय प्लॉट वाटप करून सूक्ष्म नियोजन देण्यात आले आहे. या सहाय्यकांना ई-पीक पाहणी पूर्ण करण्यासाठी किमान ४५ दिवसांचा कालावधी देण्यात आला असून मुदतीत सर्व शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी पूर्ण केली जाईल, असे सिरसेवाड पाटील यांनी सांगितले.

# दुःखाच्या काळात आधार देणारी 'स्वर्ग रथ' सेवा; दुधनीत २४ तास शववाहिनी उपलब्ध

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुधनी (प्रतिनिधी : निंगप्पा निंबाळ) – जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. दुःखाच्या प्रसंगी कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे, असे प्रतिपादन परमपूज्य श्री म. नि. प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांनी केले.

**जन्मभूमी फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम; डॉ. शांतलिंगेश्वर महा स्वामीजींच्या हस्ते लोकार्पण**

दुधनी शहर व परिसरातील नागरिकांच्या सेवेसाठी जन्मभूमी फाउंडेशनच्या वतीने नूतन 'स्वर्ग रथ' (शववाहिनी) सेवा सुरू करण्यात आली असून, या सेवेचे लोकार्पण डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या शुभहस्ते व आशीर्वादाने करण्यात आले. दुधनी शहरासह लगतच्या ग्रामीण भागात मृत्यूच्या प्रसंगी पार्थिव ने-आण करण्यासाठी वेळेवर योग्य वाहन उपलब्ध होणे ही नागरिकांसमोरील महत्त्वाची अडचण असते. ही गरज लक्षात घेऊन जन्मभूमी फाउंडेशनने पुढाकार घेत २४ तास उपलब्ध राहणारी शववाहिनी सेवा सुरू केली आहे.

**२४ तास सेवा, गरजेच्या वेळी तत्काळ मदत**

'स्वर्ग रथ'मध्ये अंत्यविधीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असून, दुधनी शहर तसेच परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना गरजेच्या वेळी ही सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तातडीच्या प्रसंगी नागरिकांना वेळेत मदत मिळावी यासाठी संस्थेने नियोजनबद्ध व्यवस्था केली आहे.



या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या तसेच अचानक आलेल्या दुःखद प्रसंगी वाहनाच्या शोधासाठी होणारी धावपळ कमी होण्यास मदत होणार आहे. मानवतेच्या भावनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

लोकार्पण सोहळ्यास जन्मभूमी फाउंडेशनचे पदाधिकारी, सदस्य तसेच दुधनी शहरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गरजूंनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

संपर्क – जन्मभूमी फाउंडेशन, दुधनी ता. अक्कलकोट, जि. सोलापूर मोबाईल : ८३२९४६४४५४

# डिकसळ येथे लहुजी शक्ती सेनेच्या वतीने शिवाजीराव गिड्डे पाटील यांची जिल्हा सरचिटणीसपदी निवड झाल्याबद्दल सत्कार



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब (प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील डिकसळ येथे भारतीय जनता पार्टीच्या धाराशिव जिल्हा सरचिटणीस पदी शिवाजीराव गिड्डे पाटील यांची निवड झाल्याबद्दल लहुजी शक्ती सेनेच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

शिवाजीराव गिड्डे पाटील यांची भाजपा पक्ष संघटनेत त्यांनी केलेल्या निष्ठावान कार्याची दखल घेऊन पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर जिल्हा सरचिटणीस पदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. त्याबद्दल त्यांचा डिकसळ येथे सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजीभाऊ गायकवाड, भाजपा अल्पसंख्याक आघाडी कळंब तालुका अध्यक्ष शहाजानभाई शिकलकर, सामाजिक कार्यकर्ते रामरतन कांबळे, भारतीय बहुजन पक्षाचे नेते विकास भाऊ गायकवाड, महादेव आंबिरकर, पवन वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मान्यवरांनी शिवाजीराव गिड्डे पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले व त्यांच्या नेतृत्वात पक्ष अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त केला.

सदरील निवडीबद्दल शिवाजीराव गिड्डे पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# वामनदादा कर्डक यांच्या विचारांचा जागर; दुसरबीड येथे १०४ वी जयंती उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

दुसरबीड : लोकशाहीर, लोककवी, महाकवी वामनदादा कर्डक यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त सिंदखेडराजा तालुक्यातील नगर माळावर, सावित्रीबाई फुले मंगल कार्यालय, दुसरबीड येथे ६ सप्टेंबर रोजी जयंती कार्यक्रम आयोजन करून वामनदादांना अभिवादन करण्यात आले. शाहीर, कलाकार, साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच वामनदादांच्या विचारांवर प्रेम करणाऱ्या असंख्य रसिकांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण लाभले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाहीर नानाभाऊ परिहार व शाहीर डी. आर. इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकजागर परिवाराचे सर्वेसर्वा प्रवीण गीते होते. यावेळी सत्कारमूर्ती म्हणून ह.भ.प. दामूअण्णा शिंगणे व प्रा. कमलेश खिल्लारे यांचा राजश्री शाहू महाराज वृद्ध कलावंत मानधन समिती बुलढाणा येथे सदस्य म्हणून निवड झाल्या बद्दल त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तोतारामजी कायंदे, भाई बबनराव म्हस्के, शिवदास रिंढे सरचिटणीस बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमेटी .कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुलजी काबरा, शंकरराव उगलमुगले, अविनाश नागरे, कैलास झिने, विठ्ठलभाऊ चव्हाण, देऊळगाव राजा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भगवानराव खरात, भाई दिलीप खरात, जेष्ठ पत्रकार भगवान साळवे, बाळासाहेब भोसले,पवन मगर, सुनील उगले सामाजिक कार्यकर्ते मलकापूर पांगरा , ॲड. वसीम शेख मुसा विलास गायकवाड, जाफरखान पठाण,यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून वामनदादा कर्डक यांच्या संघर्षमय जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या साहित्याची आणि शाहिरीची आजच्या समाजातील गरज अधोरेखित केली. वामनदादांचे गीत म्हणजे केवळ मनोरंजन नसून सामाजिक परिवर्तनाची मशाल आहे. त्यांच्या प्रत्येक गीतातून समता, बंधुता, स्वाभिमान, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा विचार समाजापर्यंत पोहोचतो, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.



वामनदादांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या व्यथा, अन्यायाविरोधातील संघर्ष आणि परिवर्तनाची आस शब्दबद्ध केली. त्यामुळे त्यांच्या गीतांकडे केवळ गाणी म्हणून न पाहता त्यामागील विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी सांगितले. वामनाचं गाणं म्हणजे विचारांचं सोनं या भावनेतून त्यांच्या साहित्याचा समाजाने वारसा पुढे नेला पाहिजे, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

जयंतीनिमित्त शाहीर व विविध कलाकारांनी आपल्या गायन व शाहिरीच्या माध्यमातून वामनदादा कर्डक यांना अभिवादन केले. त्यांच्या गाजलेल्या गीतांना रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमादरम्यान वामनदादांच्या विचारांचा जागर आणि त्यांच्या कार्याची नव्या पिढीला ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन शाहीर भीमराव थोरवे, सा. बुलडाणा चौफेर चे मुख्य संपादक डॉ. गंगाराम उबाळे, प्राचार्य समाधान जाधव, अधिकार घेवंदे यांनी केले होते.तर संगीत संयोजन बापूसाहेब रंधवे यांनी सांभाळले. सूत्रसंचालन तरुण तडफदार पत्रकार सचिन खंडारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पत्रकार डॉ. गंगाराम उबाळे यांनी केले.

**पळसवाडी चौरस्त्यावर बैलगाड्या आडव्या लावून छावाचे ठिय्या आंदोलन**

# धाराशिवमध्ये छावाचा शेतकरी आसूड मोर्चा; हेक्टरी १ लाखाच्या मदतीची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क

धाराशिव (प्रतिनिधी) शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेने आज धाराशिव येथील पळसवाडी चौरस्त्यावर भव्य रस्ता रोको व शेतकरी आसूड (रुमणं) मोर्चा काढून प्रशासनाला धारेवर धरले.

संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो कार्यकर्ते, पदाधिकारी व शेतकऱ्यांनी बैलगाड्या रस्त्यावर आडव्या लावून, हातात भगवे झेंडे आणि आसूड घेऊन सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मराठवाडा अध्यक्ष बाळासाहेब भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशासनाच्या प्रतिनिधीने निवेदन स्वीकारल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

या आंदोलनाचे प्रमुख आयोजक जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके होते.

रस्ता रोको नंतर शासकीय विश्रामगृहात जिल्हा आढावा बैठक व पत्रकार परिषद झाली. यावेळी बोलताना नानासाहेब जावळे पाटील यांनी सरकारवर टीका करताना सांगितले की, धाराशिव जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करावा, पंचनाम्याची अट न लावता सरसकट हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी, तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात, विद्यार्थ्यांची फी माफ करावी आणि कुणबी नोंदी नसलेल्या मराठ्यांना स्वतंत्र मराठा आरक्षण द्यावे. तसेच स्व. अण्णासाहेब जावळे पाटील महामंडळाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

जर या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर येत्या १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सामूहिक आत्मदहन करू, असा थेट इशाराच जावळे पाटील यांनी दिला. संपूर्ण मराठवाडा दौरा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यात मुस्लिम आघाडी जिल्हाध्यक्ष म्हणून जलील शेख, शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष म्हणून सुजित कुमार मुळे, धाराशिव तालुका अध्यक्ष म्हणून सुमित नन्नवरे, विद्यार्थी आघाडी तालुका अध्यक्ष म्हणून ओम दंडनाईक आणि कळंब तालुका उपाध्यक्ष म्हणून अमर गायकवाड यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी छावा संघटक अमोल गोरे, सचिव जोतीराम काळे, तुळजापूर तालुका अध्यक्ष रवी साळुंके, कळंब तालुका अध्यक्ष विठ्ठल यादव, सोशल मीडिया प्रमुख नानासाहेब गुंड यांच्यासह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद गाडे यांनी केले तर आभार सुजित कुमार मुळे यांनी मानले.




# शेतकऱ्याच्या पोळा सणावर कोरड्या दुष्काळाचे सावट

## औसा तालुक्यातील पोळा सणावर मंदीचे सावट, बाजारपेठेत साहित्यावर महागाईची 'संक्रात'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमर जाधव/लातूर : यावर्षी पावसाने दिलेल्या प्रचंड ओढीमुळे राज्यात सर्वत्र कोरड्या दुष्काळाचे सावट गडद झाले असून, याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या बैलपोळा सणाला बसला आहे. ऐन श्रावण-भाद्रपदात खरीप हंगामातील पिके करपून गेल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. परिणामी, दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या पोळा सणाच्या आनंदावर विरजण पडले असून बाजारपेठेतही मोठी मंदी पाहायला मिळत आहे.



साहित्याचे दर वाढले, खरेदीकडे पाठ

बैलपोळ्यासाठी बैलांना सजवण्यासाठी लागणाऱ्या विविध साहित्याच्या किमतीत यंदा २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. कच्च्या मालाचे वाढलेले भाव आणि वाहतूक खर्च यामुळे शिंगांचे गोंडे, बाशिंग, मोरकी, घुंगरमाळा, नाथ, झुली आणि रंग यांसारख्या साहित्यावर महागाईची संक्रांत आली आहे. आधीच प्रचंड महागाई ,त्यात हातात पैसा नसल्याने शेतकऱ्यांनी या महागड्या साहित्याकडे पाठ फिरवली असून, केवळ परंपरे पुरत म्हणून अगदी मोजकीच खरेदी केली जात आहे.

बाजारपेठा ओस, व्यापारी हवालदिल

दरवर्षी पोळ्याच्या दोन-चार दिवस आधी ग्राहकांच्या गर्दीने गजबजणाऱ्या बाजारपेठांमध्ये यंदा शुकशुकाट पाहायला मिळत आहे. ग्रामीण व शहरी भागातील मुख्य बाजारपेठांमध्ये दुकानदारांनी साहित्याचे स्टॉल तर मांडले आहेत, मात्र ग्राहकच नसल्याने व्यापारी वर्ग कमालीचा हवालदिल झाला आहे. वर्षभर शेतात साथ देणाऱ्या सर्जा-राजाचे ऋण मानणारा हा सण यंदा दुष्काळ आणि महागाईमुळे अत्यंत साधेपणाने साजरा करावा लागत असल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.

# बैलपोळ्यापूर्वी ऊस बिलाचा दुसरा हप्ता मिळावा, सर्व साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांना तातडीने रक्कम देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना ऊस बिलाचा दुसरा हप्ता तातडीने मिळावा, या मागणीसाठी ऊस दर संघर्ष समिती व ऊस उत्पादकांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर कारखान्या ऊस पुरवठा करूनही अनेक कारखान्याकडून ऊस बिलाचा दुसरा हप्ता अद्याप मिळालेला नाही बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा सण असून या काळात जनावरांची पूजा सजावट करण्यासाठी व सणासाठी पैसे लागत आहे त्यामुळे बैलपोळ्याचा हप्ता द्यावा असा मागणी ऊस उत्पादकांकडून होत आहे.



त्यामुळे तालुक्यातील तसेच परिसरातील सर्व साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊस बिलाचा दुसरा हप्ता तातडीने आदा करावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. सणाच्या काळात शेतकऱ्यांच्या हातात पैसे उपलब्ध झाल्यात त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. त्यावेळी शेतकऱ्यांनी तहसीलदारांना संबंधित साखर कारखाना प्रशासनाची संपर्क साधून पोस्ट बिलाचा दुसरा हप्ता लवकरात लवकर मिळवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी अशी मागणी पुरंदर संघर्ष समितीने केली आहे.

बैलपोळ्यापूर्वी ऊस बिलाचा दुसरा हप्ता मिळावा, अन्यथा पंढरपूर तहसील कार्यालयासमोर मांडलं केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला यावेळी इतर संघर्ष समितीचे समाधान फाटे, सचिन पाटील, माऊली जवळेकर, निवास नागणे, अनिल बागल, विनोद बागल इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# चिमुकले विद्यार्थीच बनले शिक्षक



**वैनतेय विद्यामंदिरात 'शिक्षक दिन' उत्साहात**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारताचे दुसरे राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे काम करून आनंददायी पद्धतीने शिक्षक दिन उत्साहात साजरा केला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे शाळेचे मुख्याध्यापक गोरख सानप यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. किरण खैरनार, मनिषा चव्हाण यांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. इयत्ता चौथीतील विद्यार्थीनी ओजस्वी माळी हिने मुख्याध्यापिकेचे कामकाज बघितले. विद्यार्थ्यांनी दिवसभरातील सर्व वर्गाच्या अध्यापनाच्या कामाचा अनुभव घेतला. यात त्यांनी विविध विषयाच्या अध्यापनासह खेळ, गाणी, गोष्टी अशा विविध प्रकारे आपले अध्यापन कौशल्य सिद्ध केले.यासाठी या चिमुकल्यांना त्यांचे शिक्षक संजय जाधव,कल्पना पेठे, विजया पवार यांनी मार्गदर्शन केले. किरण खैरनार, सविता रोहम, सुजाता पाटील यांनी शाळेतील शिक्षक व शिक्षक दिनानिमित्त नवनिर्वाचित शिक्षक म्हणून काम करणा-या शिक्षकांचा सत्कार केला. ओवी म्हैसधुणे, रेयांश कोल्हे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

बालवयातच विद्यार्थ्यांना नेतृत्व, सभाधीटपणा,नियोजन, संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी शिक्षकाच्या कार्याचा अनुभव देणा-या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे व विश्वस्त मंडळ तसेच पालकांनी अभिनंदन केले. या उपक्रमासाठी सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.

> **आज वर्गात शिक्षक म्हणून काम करतांना खूप छान वाटले तसेच वर्गात मुले त्रास देतात, शिक्षकांच्या सूचना पाळत नाही यामुळे कळाले की शिक्षकांना किती त्रास सहन करावा लागत असेल.. आजपासून आम्ही मुलांनी शिक्षकांच्या सर्व सूचना व आदेशांचे पालन करण्याचा संकल्प केला आहे.**
>
> **– काव्या कराड, विद्यार्थी शिक्षक, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर, निफाड**

# जयंतीच्या उत्सवातून जनहिताचा लढा; पुरुष सार्वजनिक शौचालयासाठी संघर्ष समिती स्थापन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी / बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६व्या जयंतीनिमित्त रमाबाई आंबेडकर नगर परिसरात सामाजिक उपक्रमाला नवी दिशा देण्यात आली. समाज परिवर्तन युवा संस्थेच्या वतीने रविवार, ६ सप्टेंबर रोजी खेमाणी, उल्हासनगर-२ येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रवेशद्वाराजवळील विठ्ठल मंदिर परिसरात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंती कार्यक्रमाला परिसरातील ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केवळ जयंती उत्सवापुरते मर्यादित न राहता स्थानिक नागरिकांच्या गेल्या २० ते २५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सार्वजनिक पुरुष शौचालयाच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

परिसरात पुरुषांसाठी सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना उघड्यावर शौचास जाण्याची वेळ येत असून, त्यातून अस्वच्छता, दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याचे नागरिकांनी मांडले. या गंभीर प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी उपस्थित नागरिकांनी एकमताने 'सार्वजनिक शौचालय संघर्ष समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेतला.



समितीच्या अध्यक्षपदी अतिष थोरात, उपाध्यक्षपदी गणेश चव्हाण, सचिवपदी रोहित वाघमारे, उपसचिवपदी केदार कांबळे, खजिनदारपदी विशाल जाधव, आरोग्य सदस्य म्हणून ज्ञानेश्वर धडे, तर सदस्य म्हणून शिवा जाधव, किशोर वाघमारे, दादू चव्हाण आणि दत्ता खंडाळे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. तसेच सार्वजनिक शौचालयाच्या मागणीसाठी सुरू होणाऱ्या पाठपुराव्याला सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला. समितीच्या पुढील कामकाजासाठी स्वतंत्र थर्हीाीग्रुप तयार करण्यात येणार असून, त्यामध्ये प्रत्येक पदाधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधित प्रशासनाकडे निवेदने देऊन सातत्याने पाठपुरावा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रमाबाई आंबेडकर नगर परिसरात पुरुषांसाठी भव्य, सुसज्ज, आधुनिक आणि स्वच्छ सार्वजनिक शौचालय उभारण्यासाठी समाज परिवर्तन युवा संस्थेच्या माध्यमातून हा लढा पुढे नेण्यात येणार आहे. हा प्रश्न केवळ शौचालयाचा नसून नागरिकांच्या आरोग्याचा, स्वच्छतेचा आणि सन्मानाचा आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# तांदुळवाडी शाळेत शिक्षक दिन उत्साहात; गुरुजनांचा विद्यार्थ्यांकडून भावपूर्ण सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब, प्रतिनिधि /सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे ५ सप्टेंबर शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी पालक श्री. आश्रुबा लिमकर यांच्या वतीने शाळेतील सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या निमित्ताने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती असलेल्या आदराच्या भावना व्यक्त करत कविता, गीते आणि वक्तृत्वाच्या माध्यमातून शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून शिक्षकांबद्दलचा आदर, प्रेम आणि कृतज्ञता दिसून आली.



कार्यक्रमात सहशिक्षिका श्रीमती आशा पवार, श्रीमती रसिका आगरकर, सहशिक्षक श्री. संतोष मोहिते तसेच मुख्याध्यापक श्री. संतोष भोजने यांनी आपल्या जीवनातील शिक्षकांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. आपल्या जीवनाला योग्य दिशा देणारे, संस्कार घडविणारे आणि यशस्वी होण्यासाठी प्रेरणा देणारे शिक्षक हे आपल्या जीवनातील खरे मार्गदर्शक असतात, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते हे अतूट आणि जिव्हाळ्याचे असून, आपल्या जीवनात घडविणाऱ्या प्रत्येक शिक्षकांबद्दल सदैव आदर व कृतज्ञतेची भावना असली पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमास अंगणवाडीच्या श्रीमती मंदाकिनी खोसे, श्रीमती संगीता काळे, श्रीमती सागरबाई लिमकर यांच्यासह अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस उपस्थित होत्या. यावेळी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती आशा पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. संतोष मोहिते यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

**१४ ऑक्टोबर २०२६ पासून सातारा येथून होणार सुरुवात**

**५ नोव्हेंबर २०२६ रोती पूणे येथे या समता मार्चची ( रॅली ) सांगता होणार**

# सामाजिक परिवर्तन समता मार्च मध्ये रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : राजाभाऊ सरवदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे सामाजिक न्याय व अधिकारीता राज्य मंत्री भारत सरकार नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ पासून सातारा येथील माता भिमाई स्मारकापासून रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सामाजिक परिवर्तन समता मार्च ला सुरुवात होणार असून दि.२५ नोव्हेंबर २०२६ रोती पूणे येथे या समता मार्चची ( रॅली ) सांगता होणार आहे तरी या सामाजिक परिवर्तन समता मार्चमध्ये रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी धाराशिव येथे आयोजित रिपाइं (आठवले) च्या जिल्हा बैठकीत बोलताना केले.

दि.७ सप्टेंबर २२६ रोजी धाराशिव येथील शासकीय विश्राम गृहात रिपाइं (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व रिपाइं चे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी जॉईंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तर रिपाइं चे धाराशिव जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली रिपाइं (आठवले) च्या जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी रिपाइं (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश सचिव संजयकुमार बनसोडे, मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष आनंद पांडागळे,मराठवाडा विभाग उपाध्यक्ष भागवत शिंदे,जेष्ठ कार्यकर्ते डी.जी.हौसलमल,अनिलकुमार धिमधीमे यांची प्रमुख उपस्थिती होती.या प्रसंगी बैठकीला मार्गदर्शन करताना राजाभाऊ सरवदे बोलत होते.




. प्रारंभी रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश जाइंट सेक्रेटरी राजा भाऊ ओव्हाळ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज्य कार्यकारणीच्या वतीने प्रदेश अध्यक्ष राजा भाऊ सरवदे यांच्या हस्ते तर धाराशिव जिल्हा कार्यकारणीच्या वतीने जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच विविध पक्ष, सामाजिक संघटना व हितचिंतकांच्या वतीने ही राजा भाऊ ओव्हाळ यांचा सत्कार करून त्याना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना राजा भाऊ ओव्हाळ म्हणाले की महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपले बाप असून रिपब्लिकन पक्ष हा आपली आई आहे. तेंव्हा रिपब्लिकन पक्षाशी प्रतारणा न करता कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने पक्षाचे काम करून जिल्हाभर पक्षाची मजबूत बांधणी करावी व वेळोवेळी पक्षाच्या अजिंठा प्रमाणे दिल्या जाणाऱ्या आदेशाचे पालन करून पक्षाशी एकनिष्ठ राहावे. दि.३ ऑक्टोबर पक्षाचा वर्धापन दिन,दि १४ऑक्टोबर कोल्हापूर येथे पक्षाच्या वतीने आयोजित बौध्द धम्म परिषद व २५ नोव्हेंबर रोजी पुणे येथे आयोजित सामाजिक समता मार्चच्या समारोप या सर्व कार्यक्रमांमध्ये धाराशिव जिल्ह्यातील रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेवटी त्यांनी केले.

या प्रसंगी रिपाइं चे राज्य सचिव संजयकुमार बनसोडे, भागवत शिंदे,आनंद पांडागळे,अनिलकुमार धीमधीमे,डी.जी.हौसलमल,मराठवाडा उपाध्यक्ष पोपट लांडगे,धाराशिव तालुका अध्यक्ष भालचंद्र कठारे, तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे,लोहारा तालुका उपाध्यक्ष गजेंद्र डावरे आदींची ही भाषणे झाली.

या वेळी रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ उर्फ मुन्ना ओव्हाळ, मराठवाडा विभाग उपाध्यक्ष पोपट लांडगे,जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के,सोमनाथ गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष रणजीत गायकवाड,प्रताप कदम,नेते फकिरा सुरवसे,मीडिया सेलचे जिल्हा अध्यक्ष आकाश बनसोडे, लोहारा तालुका अध्यक्ष काका भंडारे, परांडा तालुका अध्यक्ष दादासाहेब सरवदे,युवक शहराध्यक्ष सुर्यानंद बनसोडे, युवा नेते आकाश इंगळे, अश्रुबा शितोळे,महेश बनसोडे,सोनू झेंडे,पलाश माने,राजेश बनसोडे,रिंकू ओव्हाळ,शरद इंगळे,सह जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अनेक तरुणांनी रिपब्लिकन पक्षांमध्ये प्रवेश केला तर काही पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले यामध्ये रणजीत सुभाष बनसोडे यांना युवक जिल्हाध्यक्ष,तसेच महादेव भोसले यांना शहराध्यक्ष, सुहास झेंडे,भैय्यासाहेब नागटिळे करजखेडा यांना युवक जिल्हा संघटक म्हणून निवडीचे पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

या बैठकीचे सूत्रसंचालन रिपाइं (आठवले)चे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन धाराशिव तालुका अध्यक्ष भालचंद्र कठारे यांनी केले.